# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक : 14.10.2026** **वार : बुधवार**

---

**पुणे-टँकरने पाणी**

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातल्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सध्या बारामती, दौंड आणि इंदापूर तालुक्यांमध्ये ५ गावांना आणि ५३ वाड्यांना ८ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
तसंच शासनाकडून नळ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती कामे, स्रोत बळकटीकरणासह विहीर खोल करणे, गाळ काढणे, बोअरवेल दुरुस्ती, नव्या बोअरवेल योजना अशी विविध कामं करण्यात येत आहेत.

**पाणी तपासणी**

पुणे जिल्ह्यातल्या पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये टँकरद्वारे पुरवण्यात येणाऱ्या पाण्याची नियमित तपासणी करण्याचा निर्णय जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागानं घेतला आहे.
टँकरमध्ये पाणी भरण्याच्या ठिकाणापासून ते गावात वितरण होईपर्यंत पाण्याचे नमुने तपासले जाणार आहेत. तसंच पाणीपुरवठ्यासाठी अधिग्रहित केलेल्या विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याचीही गुणवत्ता तपासण्यात येणार आहे. दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये, यासाठी ही तपासणी सातत्यानं करण्यात येणार आहे.

**चारावाहतुक बंदी**

पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून इतर कोणत्याही जिल्ह्यात किंवा राज्याबाहेर सर्व प्रकारचा सुका आणि ओला चारा, तसेच कडबा, कुट्टी आणि पेंढा यांसारख्या चारा प्रकारांची वाहतूक तसंच विक्री करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यात जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता रहावी यासाठी जिल्हा प्रशासनानं हा निर्णय घेतला आहे.

**फॅसिलिटेशन सेंटर**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात पीएमआरडीए हद्दीतल्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि उद्योजकांच्या तांत्रिक तसंच प्रशासकीय अडचणींचं निराकरण तातडीनं करण्यासाठी 'फॅसिलिटेशन सेंटर' सुरू करण्यात येणार आहे. पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी ही माहिती दिली. उद्योजकांना विविध परवानग्या मिळविताना येणाऱ्या अडचणी दूर करणे, संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढविणे आणि प्रस्तावांवरील कार्यवाही सुलभ करणे, हा फॅसिलिटेशन सेंटरचा प्रमुख उद्देश असेल.

**कचरा**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये 'शून्य कचरा कार्यालय' उपक्रमाला नुकतीच सुरवात करण्यात आली. कार्यालयात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचं वर्गीकरण, पुनर्वापर आणि विल्हेवाट; तसंच ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खतनिर्मिती, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यासाठी काच, कागद, धातू, प्लास्टिक आणि ई-कचरा संकलनासाठी स्वतंत्र डब्यांची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी दिली.

**बौद्धमहिला परिषद**

पुण्यात येत्या 17 तारखेला आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषद आयोजित करण्यात आली आहे. विस्डम इन मोशन फोरम' आणि 'कॅटॅलिस्ट फाउंडेशन' यांनी संयुक्तपणे या परिषदेचं आयोजन केलं आहे. भारतासह श्रीलंका, व्हिएतनाम, कोरिया आणि ऑस्ट्रेलिया या देशांतील बौद्ध भिक्खुणी, विचारवंत, संशोधक परिषदेत सहभागी होणार असून बौद्ध महिलांचा ऐतिहासिक प्रवास, वर्तमानातील स्थान आणि भविष्यातील वाटचाल यांवर विचारमंथन करण्यात येईल.

**नवदुर्गा**

पुण्यातल्या माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना 'नवदुर्गा सन्मान' सोहळ्यात आज गौरवण्यात आलं. आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागातील कार्यकारी संपादक माधवी कुलकर्णी, काकडे महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. जया कदम, उद्योजिका अंजली पाटील, स्वच्छता कर्मचारी पौर्णिमा नेतलकर, समाजसेविका मनीषा सोनवणे, मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या उपसंचालक सोनाली काळे, मेट्रोचालक प्राजक्ता ठाकरे, अग्निशमन दलातील कर्मचारी मेघना सकपाळ आणि राष्ट्रीय दिव्यांग क्रिकेटपटू तन्वी शिंदे यांना उद्योजक मकरंद पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आलं.

**भाजपा**

भारतीय जनता पक्षानं पुणे शिक्षक आणि पदवीधर निवडणुकीसाठी समिती जाहीर केली आहे. चंद्रकांत पाटील यांची निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**रेल्वे-विशेष**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर गावी जाणाऱ्या प्रवासाची वाढती संख्या लक्षात घेता रेल्वे प्रशासनानं २५६ विशेष रेल्वे फेऱ्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे, हडपसर आणि खडकी स्थानकावरून विशेष मार्गावर 'ट्रेन ऑन डिमांड' विशेष रेल्वे गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

**नाव बदल**

माण-हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गावरील दोन स्थानकांची नावे बदलण्यात येणार असल्याची माहिती आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी दिली आहे. 'यशदा' स्थानकाचं नाव 'सकाळनगर', तर 'आरबीआय' स्थानकाचं नाव भोसलेनगर आरबीआय' करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**रेडीमिक्स-कॉंक्रीट**

पुण्यातल्या बावधन बुद्रुक परिसरात पाच अनधिकृत रेडी मिक्स कॉंक्रीट प्रकल्पांवर महापालिकेनं कारवाई केली. सुमारे ३५ हजार चौरस फूट बेकायदा बांधकाम पाडण्यात आलं असून, या प्रकल्पांचा वीजपुरवठाही महावितरणकडून कायमस्वरूपी बंद करण्यात आला आहे. धूळ, वायुप्रदूषण आणि आवाजामुळे त्रस्त नागरिकांनी केलेल्या तक्रारींनंतर ही कारवाई करण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल तापमान 35 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 20 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**